सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

नोंदणीचे प्रमाणपत्र

या प्रमाणपत्राद्वारे प्रमाणित करण्यात येते आहे की, शगून सिटी बंग्लो व रो–हाऊस ओनर्स सहकारी गृहनिर्माण संस्था म. कौठा नांदेड ता.जि. नांदेड ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 मधील (सन 1961 चा महाराष्ट्र नियम क्रमांक 24) कलम 9 (1) अन्वये नोंदविण्यात आलेली आहे.

जिचा नोंदणी क्रमांक : **NND/NND/HSG/TO/666/2023**

दिनांक : **20/02/2023** आहे.

उपरिनिर्दिष्ट अधिनियमाच्या कलम 12 (1) अन्वये व महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचे नियम 1961 मधील नियम क्रमांक 10 (1) अन्वये संस्थेचे वर्गीकरण 'गृहनिर्माण संस्था' असून उप–वर्गीकरण 'भाडेकरु मालकीहक्क गृहनिर्माण संस्था' आहे.

(डॉ. शुभांगी गोंड)
उपनिबंधक
सहकारी संस्था, ता.नांदेड

स्थळ : नांदेड
दिनांक : 20/02/2023

उपनिबंधक, सहकारी संस्था ता.नांदेड यांचे कार्यालय
बल्लेवार कॉम्पलेक्स, शिवाजीनगर, नांदेड
दूरध्वनी क्रमांक (02462)230078 Email ID :dyresnanded@gmail.com

जा.क्र.उनिनां/कक्ष-१/गृहनिर्माण/निशसिबंवरोहाओसगृसंमकौ/संनोप्र /ज्ञाप/ 558 /२०२३ दिनांक :२०/०२/२०२३

ज्ञापन :

उपनिबंधक, सहकारी संस्था ता.जि.नांदेड या कार्यालयाकडून नोंदणी केलेल्या " **नियोजीत शगून सिटी बंग्लो व रो-हाऊस ओनर्स सहकारी गृहनिर्माण संस्था म.कौठा, नांदेड ता.जि.नांदेड"** या संस्थेची उपविधीची प्रत, नोंदणी प्रमाणपत्रासह **श्री.चंद्रकांत किशनराव येरावार**, मुख्यप्रवर्तक " **नियोजीत शगून सिटी बंग्लो व रो-हाऊस ओनर्स सहकारी गृहनिर्माण संस्था म.कौठा, नांदेड ता.जि.नांदेड"** यांना अग्रेषीत.

श्री.एम.आर.येवते, सहकार अधिकारी श्रे.२ यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी या संस्थेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेस उपनिबंधक, सहकारी संस्था तालुका,नांदेड यांच्या वतीने उपस्थित राहावे. सभा झाल्या बाबत इतिवृत्तांच्या छायांकीत प्रतीसह अहवाल या कार्यालयास सादर करावा. त्याच प्रमाणे महाराष्ट् सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ५९ नूसार मुख्य प्रवर्तक यांनी सभा घेण्यास कसूर केल्यास तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(स्वाक्षरीत)
(डॉ.शुभांगी सं गोंड)
उपनिबंधक,
सहकारी संस्था ता.जि.नांदेड

प्रतिलिपी,

१) **श्री.चंद्रकांत किशनराव येरावार** मुख्यप्रवर्तक, " **नियोजीत शगून सिटी बंग्लो व रो-हाऊस ओनर्स सहकारी गृहनिर्माण संस्था म.कौठा, नांदेड ता.जि.नांदेड"** यांना नोंदणी प्रमाणपत्र, व संस्थेची मंजूर उपविधीसह पुढील कार्यवाहीसाठी देण्यात येत आहे. त्याच प्रमाणे मुख्यप्रवर्तक यांना कळविण्यात येते आहे की, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ५९ मध्ये खालील प्रमाणे तरतुद केलेली आहे.

१) संस्थेच्या मुख्यप्रवर्तक, संस्थेची नोंदणी करण्यात आल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत, ज्या व्यक्ती एकत्र येवून संस्थेच्या नोंदणीसाठी अर्ज केला होता अशा सर्व व्यक्तींची पहिली साधारण सभा भरवील. मुख्य प्रवर्तक वर सांगितल्या प्रमाणे सभा बोलावण्यात कसूर करील, अशा बाबतीत, निबंधकाकडून प्राधिकृत करण्यात येईल अशी कोणतीही व्यक्ती सभा भरवील.

२) पहिल्या साधारण सभेत, पुढील कामकाज करण्यात येईल.

एक) सभेसाठी अध्यक्षांची निवडणूक

दोन्) नवीन सदस्यांना दाखल करुन घेणे.

तीन) हिशोबपत्रक स्वीकारणे आणि सभेच्या तारखेच्या १४ दिवस आधी प्रवर्तकाने केलेल्या सर्व व्यवहारांबाबत प्रतिवृत्त सादर करणे.

चार) उपविधीअन्वये रीतसर निवडणुका घेण्यात येईपर्यंत हंगामी समितीची रचना करणे. उपविधीस अनुसरुन निवडलेल्या समितीस जे अधिकार व कामे असतील, तेच अधिकार व कामे हंगामी समितीस असतील.

पाच) ज्या मर्यादेपर्यंत पैसा कर्जाऊ घेता येईल् ती मर्यादा निश्‍चित करणे;

सहा) उपविधीत जिचा विशेषकरुन उल्लेख करण्यात आला आहे अशी कोणतीही इतर बाब.

मुख्यप्रवर्तक यांनी वरील प्रमाणे संस्थेची पहिली साधारण सभा घेण्यासाठी कार्यवाही करावी.

२) श्री.एम.आर.येवते, सहकार अधिकारी श्रे.२ यांना उपनिर्दिष्ट सूचनासह उचित कार्यवाहीसाठी रवाना.

३) शाखाधिकारी, दि.भाग्यलक्ष्मी महिला सहकारी बँक लि.नांदेड मुख्य शाखा, नांदेड

४) मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,नांदेड यांना मंजूर उपविधीसह माहितीस्तव सविनय सादर.

५) जिल्हा विशेष लेखापरिक्षक (वर्ग-१), सहकारी संस्था, नांदेड यांना माहितीस्तव रवाना.

(डॉ.शुभांगी सं गोंड)
उपनिबंधक,
सहकारी संस्था ता.जि.नांदेड